# महाराष्ट्र शासन
# शासकीय आयुर्वेद महाविद्यालय, जळगांव

श्री. गुलाबराव देवकर अभियांत्रिकी महाविद्यालय परिसर, शिरसोली रोड, जळगांव 425002
Website- www.gacjalgaon.gov.com E-mail – gacjalgaon@gmail.in
☎- 0257-2996423


जा.क्र.शाआमज/आस्था/कंअप/जाहिरात/ 3201 /2026 दि. 14.07.2026

**कंत्राटी पध्दतीने अध्यापकांची पदे भरणेबाबत.**

संदर्भ- १. वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग शासन निर्णय क्र.एमईएस/१५०८/ प्र.क्र.९४/०८/वैसेववा-१ दि. ०७.०९.२०११

२. वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग शासन निर्णय क्र.एमईएस/१०२१/ प्र.क्र.१३०/(भाग-१)/आयु-१ दि. ०४.११.२०२२.

उपरोक्त संदर्भित शासन निर्णयान्वये निर्देशित केल्यानुसार, शासकीय आयुर्वेद महाविद्यालय, जळगांव येथील विविध विषयांच्या प्राध्यापक व सहयोगी प्राध्यापक या पदांवर केवळ ११ महिन्यांच्या कालावधीसाठी कंत्राटी पध्दतीने तात्पुरत्या स्वरुपात नेमणूक करण्यासाठी विविध अटी व शर्तींची पुर्तता करणा-या पात्र व इच्छुक उमेदवारांनी थेट मुलाखतीसाठी (Walk-In-Interview) आवश्यक त्या मूळ प्रमाणपत्र व इतर आवश्यक त्या कागदपत्रांसह दि.२३.०७.२०२६ रोजी सकाळी १०.०० वा या महाविद्यालयात उपस्थित रहावे.

रिक्त पदांचा तपशिल खालील प्रमाणे-

| विभागाचे नांव | प्राध्यापक | सहयोगी प्राध्यापक | सहाय्यक प्राध्यापक |
|---|---|---|---|
| क्रियाशारिर | - | ०१ | - |
| शारिररचना | ०१ | ०१ | - |
| द्रव्यगुण | - | ०१ * | ०१ * |
| शालाक्यतंत्र | ०१ | - | ०१ * |
| रोगनिदान | ०१ | - | - |
| संस्कृत संहिता सिंध्दान्त | - | - | ०१ * |
| पंचकर्म | ०१ | - | - |
| कौमारभृत्य | ०१ | - | ०१ * |
| कायाचिकीत्सा | - | ०१ * | ०१ * |
| प्रसुतितंत्र व स्त्रीरोग | - | - | ०१ * |
| अगदतंत्र एवं विधि वैद्यक | - | ०१ * | ०१ * |
| शल्यतंत्र | - | ०१ * | ०१ * |
| एकूण रिक्त पदे | ०५ | ०६ | ०८ |



Scanned with OKEN Scanner

# पदसंख्येत बदल होण्याची शक्यता.

**टिप- १. उपरोक्त नमुद रिक्त पदावर मुलाखतीच्या/रुजु दिनांकापर्यंत महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून नियमित नियुक्तीने / पदोन्नतीने किंवा बदलीने किंवा अन्य प्रशासनिक कारणास्तव उमेदवार उपलब्ध झाल्यास, त्या संबंधित विषयातील अध्यापकांचा मुलाखतीसाठी/नियुक्तीसाठी विचार केला जाणार नाही याची सर्व संबधित नोंद घ्यावी.**

| | |
|---|---|
| **प्रत्यक्ष मुलाखतीचे स्थळ -** | **शासकीय आयुर्वेद महाविद्यालय, जळगांव<br>श्री गुलाबराव देवकर अभियांत्रिकी महाविद्यालय परिसर, शिरसोली रोड, जळगाव-४२५००२** |
| प्रत्यख मुलाखतीचा दिनांक | **दि. 23.07.2026** |
| **प्रत्यक्ष मुलाखतीची वेळ.** | **सकाळी 10.00 वा.**<br>(सकाळी 10.30 वाजेनंतर उपस्थित राहणा-या उमेदवारांचा मुलाखतीसाठी विचार केला जाणार नाही.) |

| | | |
|---|---|---|
| **पदनाम** | | **प्राध्यापक** |
| **वयोमर्यादा** | | कमाल वयोमर्यादा ६५ वर्षापर्यंत. (परंतु सदर अध्यापकांची त्याच्या वयाच्या ६५ वर्ष पुर्ण होईपर्यत त्यांचा किमान ११ महिण्याचा सेवाकालावधी पुर्ण होणे आवश्यक राहील.) |
| **शैक्षणिक अर्हता** | | १. महाराष्ट्र वैद्यक व्यवसायी अधिनियम १९६१ (१९६१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रं.२८) या अधिनियमाच्या परीशिष्टाच्या भाग-अ, भाग-अ-१, भाग-ब, भाग-क मध्ये नमुद केलेल्या अर्हतापैकी एक अथवा भारतीय वैद्यक केंद्रिय वैद्यक परीषद अधिनियम, १९७० (१९७० चा ४८) या अधिनियमाखाली, भारतीय केंद्रिय वैद्यक परीषदेने वेळोवेळी निर्देशीत केलेली समतुल्य अर्हता.<br>२. संविधिक विद्यापीठाची अथवा मान्यताप्राप्त संस्थेची संबधीत आयुर्वेद विषयातील पदव्युत्तर पदवी.<br>३. ज्या उमेदवारांचे आयुर्वेद विषयातील स्वतःचे मुलभुत संशोधन निबंध अथवा पुस्तके, प्रसिध्द झालेली आहेत अशा उमेदवारांना प्राधान्य देण्यात येईल.<br>४. इंग्रजी, मराठी, संस्कृत आणि हिंदी या भाषेचे पुरेसे ज्ञान असावे म्हणजे त्यानुसार तो त्या भाषा सहजपणे लिहण्यास, वाचण्यास व बोलण्यास समर्थ असला पाहीजे. |
| **अनुभव** | | शैक्षणिक अर्हतेमधील (१ व २) येथे दर्शविलेली अर्हता प्राप्त करुन घेतल्यानंतरचा, संबधित आयुर्वेदाच्या विषयामध्ये एकूण दहा वर्षाचा अध्यापनाचा अनुभव आवश्यक असेल, त्यापैकी मान्यताप्राप्त संस्थेतून संबंधित आयुर्वेदाच्या विषयाचे सहयोगी प्राध्यापक पदाचा किमान पाच वर्षे अध्यापनाचा अनुभव असणे आवश्यक राहील. |
| **मानधन** | | प्रतिमाह रु.१५००००/- (या व्यतिरिक्त कोणत्याही प्रकारचे भत्ते व आर्थिक फायदे अनुज्ञेय असणार नाहीत.) तसेच सदर मानधन हे १० - कंत्राटी सेवा या लेखाशिर्षाखाली अनुदान उपलब्धतेच्या व उपस्थितीच्या अधिन राहुन अदा करण्यात येईल. |

| | | |
|---|---|---|
| **पदनाम** | | **सहयोगी प्राध्यापक** |
| **वयोमर्यादा** | | कमाल वयोमर्यादा ६५ वर्षापर्यंत (परंतु सदर अध्यापकांची त्याच्या वयाच्या ६५ वर्ष पुर्ण होईपर्यत त्यांचा किमान ११ महिण्याचा सेवाकालावधी पुर्ण होणे आवश्यक राहील.) |
| **शैक्षणिक अर्हता** | | १. महाराष्ट्र वैद्यक व्यवसायी अधिनियम १९६१ (१९६१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रं.२८) या अधिनियमाच्या परीशिष्टाच्या भाग-अ, भाग-अ-१, भाग-ब, भाग-क मध्ये नमुद केलेल्या अर्हतापैकी एक अथवा भारतीय वैद्यक केंद्रिय वैद्यक परीषद अधिनियम, १९७० (१९७० चा ४८) या अधिनियमाखाली, भारतीय केंद्रिय वैद्यक परीषदेने वेळोवेळी निर्देशीत केलेली समतुल्य अर्हता. |



Scanned with OKEN Scanner

| | | |
|---|---|---|
| | | २. संविधिक विद्यापीठाची अथवा मान्यताप्राप्त संस्थेची संबधीत आयुर्वेद विषयातील पदव्युत्तर पदवी.<br>३. ज्या उमेदवारांचे आयुर्वेद विषयातील स्वतःचे मुलभुत संशोधन निबंध अथवा पुस्तके, प्रसिध्द झालेली आहेत अशा उमेदवारांना प्राधान्य देण्यात येईल.<br>४. इंग्रजी, मराठी, संस्कृत आणि हिंदी या भाषेचे पुरेसे ज्ञान असावे म्हणजे त्यानुसार तो त्या भाषा सहजपणे लिहण्यास, वाचण्यास व बोलण्यास समर्थ असला पाहीजे. |
| **अनुभव** | | शैक्षणिक अर्हतेमधील (१ व २) येथे दर्शविलेली अर्हता प्राप्त करुन घेतल्यानंतर, ज्याला आयुर्वेदाच्या संबंधित विषयामध्ये एकूण ५ वर्षाचा अध्यापनाचा अनुभव असेल, त्यापैकी मान्यताप्राप्त संस्थेतुन संबंधित आयुर्वेदाच्या विषयाचे सहाय्यक प्राध्यापक म्हणुन ३ वर्षे अध्यापनाचा अनुभव असला पाहिजे. |
| **मानधन** | | प्रतिमाह रु. १२००००/- (या व्यतिरिक्त कोणत्याही प्रकारचे भत्ते व आर्थिक फायदे अनुज्ञेय असणार नाहीत.) तसेच सदर मानधन हे १० - कंत्राटी सेवा या लेखाशिर्षाखाली अनुदान उपलब्धतेच्या व उपस्थितीच्या अधिन राहुन अदा करण्यात येईल. |

| **पदनाम** | | **सहाय्यक प्राध्यापक** |
|---|---|---|
| **वयोमर्यादा** | | कमाल वयोमर्यादा ६५ वर्षापर्यंत (परंतु सदर अध्यापकांची त्याच्या वयाच्या ६५ वर्ष पुर्ण होईपर्यंत त्यांचा किमान ११ महिण्याचा सेवाकालावधी पुर्ण होणे आवश्यक राहील.) |
| **शैक्षणिक अर्हता** | | १. महाराष्ट्र वैद्यक व्यवसायी अधिनियम १९६१ (१९६१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रं.२८) या अधिनियमाच्या परीशिष्टाच्या भाग-अ, भाग-अ-१, भाग-ब, भाग-क मध्ये नमुद केलेल्या अर्हतापैकी एक अथवा भारतीय वैद्यक केंद्रिय वैद्यक परीषद अधिनियम, १९७० (१९७० चा ४८) या अधिनियमाखाली, भारतीय केंद्रिय वैद्यक परीषदेने वेळोवेळी निर्देशीत केलेली समतुल्य अर्हता.<br>२. संविधिक विद्यापीठाची अथवा मान्यताप्राप्त संस्थेची संबधीत आयुर्वेद विषयातील पदव्युत्तर पदवी.<br>३. ज्या उमेदवारांचे आयुर्वेद विषयातील स्वतःचे मुलभुत संशोधन निबंध अथवा पुस्तके, प्रसिध्द झालेली आहेत अशा उमेदवारांना प्राधान्य देण्यात येईल.<br>४. इंग्रजी, मराठी, संस्कृत आणि हिंदी या भाषेचे पुरेसे ज्ञान असावे म्हणजे त्यानुसार तो त्या भाषा सहजपणे लिहण्यास, वाचण्यास व बोलण्यास समर्थ असला पाहीजे. |
| **मानधन** | | प्रतिमाह रु. १,००,०००/- (या व्यतिरिक्त कोणत्याही प्रकारचे भत्ते व आर्थिक फायदे अनुज्ञेय असणार नाहीत.) तसेच सदर मानधन हे १० - कंत्राटी सेवा या लेखाशिर्षाखाली अनुदान उपलब्धतेच्या व उपस्थितीच्या अधिन राहुन अदा करण्यात येईल. |

| **पदनाम** | | संस्कृत संहिता अध्यापक |
|---|---|---|
| **वयोमर्यादा** | | वयोमर्यादा ६५ वर्ष |
| **शैक्षणिक अर्हता** | | MA संस्कृत |
| **मानधन** | | प्रत्येक तासिकेसाठी रु. ५००/-या प्रमाणे एका महिन्यामध्ये आवश्यकतेनुसार कमाल (१०) तासिकांचे मानधन अनुज्ञेय राहील. त्या व्यतिरिक्त कोणत्याही प्रकारचे भत्ते व आर्थिक फायदे अनुज्ञेय राहणार नाही. |



Scanned with OKEN Scanner

**इतर अटी**

१. कंत्राटी पध्दतीने करावयाच्या नियुक्तीचा कालावधी हा महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडुन नियमित नियुक्तीने किंवा आस्थापना मंडळाकडुन पदोन्नतीने अथवा बदलीने तसेच अन्य प्रशासनिक कारणास्तव उमेदवार उपलब्ध होईपर्यन्त अथवा ११ महिने कालावधी किंवा वयाची ६५ वर्षे या पैकी जे अगोदर घडेल तो कालावधी राहील. मात्र कोणत्याही परिस्थितीत ११ महिन्याच्या कालावधीनंतर खंड दिल्याशिवाय पुनः करार पध्दतीने नियुक्ती दिली जाणार नाही. तथापी सदर उमेदवाराने त्याच्या वयाची ६५ वर्षे पूर्ण केल्यानंतर अशा उमेदवारांना कोणत्याही परिस्थितीत पुनर्नियुक्त्या देण्यात येणार नाहीत.

२. सदर पदावर नियमित उमेदवारांची नियुक्ती झाल्यास त्या तारखेस किंवा ११ महिन्यानंतर कंत्राटी स्वरुपाची नियुक्ती आपोआप संपुष्टात येईल.

३. नियुक्तीसाठी बाहयशक्तीचा दबाव अथवा शिफारस आणणारे उमेदवार नियुक्तीसाठी आपोआप अपात्र ठरतील.

४. सदर पदावर नियमीत उमेदवाराची नियुक्ती झाल्यास त्या तारखेस तात्पुरत्या स्वरुपात कंत्राटी पध्दतीने केलेली नियुक्ती आपोआप संपुष्टात येईल.

५. नियमित नियुक्त आणि कार्यरत अध्यापकांप्रमाणेच पदाची कर्तव्ये व जबाबदा-या पार पाडाव्या लागतील. तसेच त्यांचेप्रमाणे उमेदवारांचे कामाचे तास राहतील तसेच त्यांना प्राप्त होणारे कागदपत्रे/माहिती व आधार सामुग्रीबाबत गोपनीयता पाळणे आवश्यक राहील.

६. उमेदवारास सार्वजनिक सुटटी आणि रविवार व्यतिरिक्त फक्त ०८ नैमित्तीक रजा अनुज्ञेय राहतील. इतर कोणत्याही रजा अनुज्ञेय राहणार नाहीत.

७. कंत्राटी पध्दतीवरील नियुक्त उमेदवारास राजिनामा द्यावयाचा झाल्यास त्यांनी (०१) महीन्याची आगाऊ नोटीस अधिष्ठातांकडे देणे बंधनकारक राहील. ते शक्य नसल्यास (०१) महिन्याच्या मानधनाची रक्कम शासकीय कोषागारात जमा केल्यानंतर त्याचा/तिचा राजीनामा मंजुर करता येईल.

८. कंत्राटी पध्दतीवरील नियुक्ती केलेल्या उमेदवारांच्या कामकाजाचा आढावा विभाग प्रमुख व अधिष्ठाता यांचेकडून नियमीतपणे घेण्यात येईल. असा आढावा असमाधानकारक असल्यास संबधीत उमेदवारांच्या नियुक्त्या पुर्वसुचना न देता समाप्त करण्याचे अधिकार अधिष्ठांताकडे राहतील.

९. कंत्राटी पध्दतीच्या उमेदवारांस विभागातील नियमित कार्यरत वरिष्ठ अध्यापक तसेच अधिष्ठाता यांच्या नियत्रंणाखाली आपल्या पदाचे कर्तव्य व जबाबदा-या पार पाडाव्या लागतील तसेच या उमेदवारांना नियमित अध्यापकांप्रमाणे पूर्णवेळ काम करणे बंधनकारक राहील.

१०. कंत्राटी पध्दतीवरील नियुक्त अध्यापकांना त्यांच्यावर सोपविण्यात आलेल्या महाविद्यालयीन व रुग्णालयीन कर्तव्ये व जबाबदा-यावर विपरीत परीणाम होणार नाही याची दक्षता घेवुन खाजगी वैद्यकीय व्यवसाय करण्यास मुभा राहील.

११. कंत्राटी पध्दतीवरील नियुक्त उमेदवारांना नियमित नियुक्तीसाठी कोणताही हक्क राहणार नाही व न्यायालयातही करार पध्दतीची नियुक्ती कायम करण्याबांबतचा दावा करता येणार नाही. तसेच करार पध्दतीवरील काम केलेला कालावधी सेवानिवृत्तीच्या लाभासाठी विचारांत घेता येणार नाही.

१२. नियुक्ती आदेश मिळाल्यापासुन (७) दिवसाच्या आंत नियुक्तीच्या ठिकाणी रुजु न झाल्यास नियुक्तीवरील दावा आपोआप संपुष्टात येईल.

१३. कार्यालयीन वेळेत खाजगी व्यवसाय करता येणार नाही. तसे आढळल्यास त्यांची सेवा तात्काळ समाप्त करण्यात येईल.

१४. शासन निर्णयातील अटी व शर्तीचे पालन करणेसंबधीची तसेच कायम नियुक्तीसाठी न्यायालयात दावा दाखल न करणेसंबधीचे बंधपत्र सादर करणे आवश्यक राहील. तसेच शासन/सक्षम



Scanned with OKEN Scanner

प्राधिकरण/कार्यालयाकडुन वेळोवेळी प्राप्त निर्देश/आदेशाचे पालन करणे संबंधितास बंधनकारक राहील.

१५. नियुक्ती प्रक्रियेच्या कोणत्याही टप्यावर फेरबदल करण्याचे किंवा रद्द करण्याचे सर्व अधिकार अधिष्ठाता यांचेकडे राखीव आहेत.

१६. उमेदवार सध्या अन्य संस्थेत कार्यरत असल्यास संबंधित संस्थेचे ना-हरकत प्रमाणपत्र प्रत्यक्ष मुलाखतीच्या दिवशी सादर करणे तसेच उमेदवाराची निवड झाल्यास रुजु होते वेळी संबंधित संस्थेचे कार्यमुक्ती आदेश (Relieving Order) सोबत असणे आवश्यक राहील.

१७. उमेदवार वयाची ६५ वर्षे पुर्ण केल्यानंतर त्यांची सेवा समाप्त करण्यात येईल.

१८. सदर पदाचे कंत्राटी मानधन "१० - कंत्राटी सेवा" या लेखाशिर्षाखाली अनुदान उपलब्धतेनुसार अदा करण्यात येत असल्याने सदर लेखाशिर्षात अनुदान उपलब्ध होईपर्यंत विलंब होऊ शकतो. त्यासाठी कार्यालयाकडे कोणताही तगादा लावता येणार नाही.

१९. CME प्रशिक्षण/P.hD./ कार्यशाळा कालावधी कर्तव्य कालावधी धरण्यात येणार नाही. त्याकरिता नियमाप्रमाणे नैमित्तीक रजा भरुन द्यावी लागेल अथवा सदर CME प्रशिक्षण/P.hD./ कार्यशाळा दरम्यानच्या कालावधीचे वेतन कपात करण्यात येईल.

२०. कंत्राटी पध्दतीने नियुक्त करण्यात आलेल्या उमेदवारास कोणत्याही प्रकारचे प्रशासकीय व वित्तीय अधिकार प्रदान करण्यात येणार नाहीत.

२१ उमेदवारानी मुलाखतीस येतांना आवश्यक ते सर्व संबधीत मुळ कागदपत्रे व त्यांच्या सत्यप्रती सोबत आणाव्यात तसेच अनुभव प्रमाणपत्रए सध्या इतर संस्थेत कार्यरत असल्यास सदर संस्थेचे ना हरकत प्रमाणपत्र आणणे अनिवार्य राहीलण

२२ संस्कृत तासिका अध्यापकाचा नियुक्ती कालावधी हा ११ महिन्यांचा असेल सदर कालावधी संपल्यानंतर नियुक्ती आपोआप संपुष्टात येईलण

२३ संस्कृत तासिका अध्यापकांना विभाग प्रमुख व अधिष्ठाता यांनी वेळोवेळी दिलेल्या निर्देशानुसार व मार्गदर्शनाखली संस्कृत या विषयाच्या अध्यापनाचे कामे करावे लागेलण

२४ संस्कृत संहिता अध्यापकाच्या विभाग प्रमुख व अधिष्ठाता नियमितपणे आढावा घेतील व अध्यापकाचे काम समाधानकारक नसल्यास किंवा आपल्या अध्यापनाची आवश्यकता संपुष्टात आल्यास आपली तासिका मानधन तत्वावावरील तात्पुरती नियुक्ती केव्हाही पुर्व सुचना न देता रद्द करण्याचे अधिष्ठाता यांना राहतीलण भविष्यात आपणास नियमित नियुक्तीसाठी कोणताही हक्क राहणार नाहीण तसेच त्यासाठी न्यायालयात दाद मागता येणार नाही.

तरी सदर पदावर नियुक्तीसाठी इच्छुक व पात्र उमेदवारांनी www.mahaayush.gov.in तसेच www.gacjalgaon.com या वेबसाईट वर उपलब्ध करुन दिलेल्या विहीत नमुन्यातच अर्ज भरुन, आवश्यक प्रमाणपत्राच्या मुळ प्रती तसेच सदर प्रमाणत्राच्या एक स्वंसांक्षाकीत (Self Attested) प्रतीसह अधिष्ठाता, शासकीय आयुर्वेद महाविद्यालय, श्री गुलाबराव देवकर अभियांत्रिकी महाविद्यालय परिसर, शिरसोली रोड, मोहाडी, जळगाव-४२५००२ येथे प्रत्यक्ष मुलाखतीच्या दिवशी दि. **23.07.2026** रोजी सकाळी **10.00** वा उपस्थित

**सदरील ठिकाणी उपस्थित राहणेकरिता आपणांस कोणताही अनुषंगिक खर्च दिला जाणार नाही. याची कटाक्षाने नोंद घ्यावी.**

डॉ संतोष गुलाबराव चव्हाण
अधिष्ठाता
शासकीय आयुर्वेद महाविद्यालय, जळगांव



Scanned with OKEN Scanner

**अर्जाचा नमुना**
**महाराष्ट्र शासन**
**शासकीय आयुर्वेद महाविद्यालय, जळगाव**

प्रति,
अधिष्ठाता,
शासकीय आयुर्वेद महाविद्यालय,
जळगाव

विषय :- आपल्या महाविद्यालयातील प्राध्यापक/सहयोगी प्राध्यापक ------------------------------- ------- या पदावर कंत्राटी पध्दतीने ११ महिन्याच्या कालावधीकरीता नियुक्ती मिळणेबाबतचा अर्ज सादर करणेबाबत

संदर्भ:- आपली जाहिरात दिनांक..............

महोदय,

उपरोक्त संदर्भित जाहिरातीस अनुसरुन मी आपल्या महाविद्यालयातील प्राध्यापक/ सहयोगी प्राध्यापक ....................(विषय) या पदावर कंत्राटी पध्दतीने ११ महिन्याच्या कालावधीकरीता नमुद अटी व शर्तीच्या अधिन राहुन नियुक्ती मिळणेबाबतचा अर्ज सादर करीत आहे.

माझी संपुर्ण माहिती खालीलप्रमाणे आहे.

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १) | संपुर्ण नांव | : | आडनाव | स्वतः चे नांव | वडीलांचे/ पतीचे नांव |
| २) | नवीन अध्यापक सांकेतांक (Permanent NEW CCIM TEACHER CODE) | : | | | |
| ३) | पत्रव्यवहाराचा पत्ता | : | | | |
| ४) | भ्रमणध्वनी क्रमांक :<br>ई-मेल : | : | | | |
| ५) | उमेदवार सध्या अन्य संस्थेत कार्यरत आहे का | : | | | |
| ६) | जन्म दिनांक, | : | | | |
| ७) | अर्ज स्विकारण्याच्या शेवटच्या दिनांकास वय | : | वर्ष | महीने | दिवस |
| | | | | | |
| ८) | राष्ट्रीयत्व | : | | | |
| ९) | **शैक्षणिक अर्हता : बीएएमएस प्रथम वर्षापासुन सुरुवात करावी व सोबत सर्व वर्षाच्या सांक्षाकीत गुणपत्रीका जोडाव्यात.** | | | | |

| अ.क्रं. | बोर्डाचे/विद्यापीठाचे नांव | उत्तीर्ण केलेल्या परीक्षा | उत्तीर्ण केल्याचे वर्ष | प्राप्त टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| १. | | | | |



Scanned with OKEN Scanner

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | २ | | | | |
| | ३. | | | | |
| | ४. | | | | |
| | ५. | | | | |
| | ६. | | | | |
| | ७. | | | | |

१०) अवगत असणा-या भाषा : (योग्य ठिकाणी (✓) अशी खुण करावी)

| मराठी | हिंदी | इंग्रजी | संस्कृत | अन्य |
|---|---|---|---|---|
| | | | | |

११) कामाचा अनुभव : (प्रमाणपत्राच्या सांक्षाकीत प्रती जोडल्या असतील तरच ग्राहय धरला जाईल)

| अ.क्रं. | संस्थेचे नांव | धारण केलेले पद | अनुभवाचा कालावधी | विद्यापिठाची मान्यता होती काय, असल्यास विद्यापिठाचे पत्र जोडावे. |
|---|---|---|---|---|
| १. | | | | |
| २. | | | | |
| ३. | | | | |
| ४. | | | | |
| ५. | | | | |
| ६. | | | | |
| ७. | | | | |
| ८. | | | | |
| ९. | | | | |
| १०. | | | | |

१२) प्रकाशीत लेखांचा तपशिल (लेख्यांचा सांक्षाकीत प्रती जोडण्यात याव्यात) :

१३) प्रकाशीत पुस्तकांचा तपशिल :

१४) पुरस्कार मिळाले असतील तर त्याचा तपशिल (प्रमाणपत्राच्या सांक्षाकीत प्रती जोडण्यात याव्यात)

१५) अर्जासोबत जोडलेल्या कागदपत्रांचा तपशिल :

| | |
|---|---|
| १. | |
| २. | |
| ३. | |



| | |
|---|---|
| ४. | |
| ५. | |
| ६. | |
| ७. | |
| ८. | |
| ८. | |
| ९. | |
| १०. | |
| ११. | |
| १२. | |
| १३. | |
| १४. | |
| १५. | |
| १६. | |
| १७. | |
| १८. | |
| १९. | |
| २०. | |



Scanned with OKEN Scanner

| | | |
|---|---|---|
| | ४. | |
| | ५. | |
| | ६. | |
| | ७. | |
| | ८. | |
| | ८. | |
| | ९. | |
| | १०. | |
| | ११. | |
| | १२. | |
| | १३. | |
| | १४. | |
| | १५. | |
| | १६. | |
| | १७. | |
| | १८. | |
| | १९. | |
| | २०. | |



Scanned with OKEN Scanner

## अर्जासोबत जोडावयाच्या कागदपत्रांची यादी

| Sr.No. | Document Name | जोडले आहे/ नाही |
|---|---|---|
| 01 | SSC Passing Certificate (For D.O.B.)/T.C. (any one) | |
| 02 | Nationality/Domicile | |
| 03 | BAMS 1st Year to Final Year Marksheet | |
| 04 | BAMS passing Certificate | |
| 05 | Internship Completion Certificate | |
| 06 | BAMS Degree Certificate | |
| 07 | PG Degree Certificate/Passing Certificate | |
| 08 | Registration Certificate of State Council | |
| 09 | MS-CIT or Equivalent Qualification | |
| 10 | Experience Certificate | |
| 11 | No Objection Certificate from current institute | |
| 12 | Additional qualification in concern subject if any (Ph.D.) (if applicable) | |
| 13 | Research Paper publication in National or International Peer reviewed index journal | |
| 14 | Proof of Text Book / Ref. Book/chapter written in any other book approved by university | |
| 15 | Participation in National/International CME / Conference / Seminar etc. | |

उमेदवाराची स्वाक्षरी

Scanned with OKEN Scanner

(सध्या कार्यरत अध्यापकांनी मुलाखतीच्या वेळी सादर करणे बंधनकारक)

-ना हरकत प्रमाणपत्र -

प्रमाणित करण्यात येते की, वैद्य / वैद्या ..........................................या महाविद्यालयात दिनांक पासुन या पदावर कार्यरत आहेत. वैद्य / वैद्या ..........................................यांची शासकीय आयुर्वेद महाविद्यालय, जळगांव येथे प्राध्यापक / सहयोगी प्राध्यापक / सहाय्यक प्राध्यापक या पदावर कंत्राटी पध्दतीने नियुक्ती झाल्यास महाविद्यालय यांना कार्यमुक्त करेल व त्यांच्या मुलाखतीस महाविद्यालय व संस्थेची काहीही हरकत नाही.

| संस्थाप्रमुख | अधिष्ठात/ प्राचार्य |
|---|---|
| .............................. | .............................. |
| .............................. | .............................. |
| .............................. | .............................. |

(रुजू होताना खालील प्रमाणपत्र सादर करावे)

प्रतिज्ञापत्र (विवाहीत उमेदवारांसाठी)

महाराष्ट्र नागरी सेवा मर्यादित (लहान कुटूंबाचे प्रतिज्ञापत्र) नियम २००५ नुसार

नियम अ

मी श्री/ श्रीमती ................................................ श्री. ...................... यांचा मुलगा/मुलगी/पत्नी, वर्षे............... राहणार याद्वारे पुढीलप्रमाणे असे जाहीर करतो/ करते की,

१. मी .......................................... या पदासाठी अर्ज दाखल केला आहे.

२. आज रोजी मला .............. (संख्या) इतकी हयात मुले आहेत. त्यापैकी दिनांक २८.०३.२००५ यानंतर जन्माला आलेली मुलांची संख्या ........... आहे. (असल्यास जन्म दिनांक नमूद करावा)

हयात असलेल्या अपत्यांची संख्या दोनपेक्षा जास्त असेल तर दिनांक २८.०३.२००५ व तदनंतर जन्माला असलेल्या अपत्यामुळे या पदासाठी अनर्ह/ अपात्र ठरविण्यास पात्र राहील याची मला जाणीव आहे.

ठिकाण -

दिनांक -

उमेदवाराचे नाव व सही.

.........................................................................................



Scanned with OKEN Scanner

## प्रतिज्ञापत्र

मी श्री/श्रीमती/कुमारी ................................................प्रतिज्ञापुर्वक नमुद करतो/करते कि, वर नमुद केलेली माहीती पुर्णत: खरी असुन ती खोटी आढळल्यास माझी उमेदवारी नियुक्तीच्या ठिकाणी कोणत्याही टप्प्यावर किंवा नियुक्तीनंतर रद्य करण्यात येईल आणि माझेविरुध्द कायदेशीर कार्यवाही होईल, याची मला जाणीव आहे. तसेच सदरची नेमणुक निव्वळ तात्पुरत्या स्वरुपाची कंत्राटी पध्दतीवर असल्यामुळे नियमीत नियुक्तीसाठी मला हक्क सांगता येणार नाही आणि जाहीरातीत उल्लेखीत कारणास्तव नियमीत नियुक्तीचा उमेदवार/महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडुन/आस्थापना मंडळाकडुन/बदलीने उपलब्ध झाल्यास माझी तात्पुरती स्वरुपाची कंत्राटी नेमणुक आपोआप रद्द होईल, याची मला जाणीव आहे.

**ठिकाण –**

**दिनांक –**

**उमेदवाराचे नाव व सही**

Scanned with OKEN Scanner